Date: / /

# Topic-1 Nature of Sociology
## समाजशास्त्राचे स्वरूप

## A] Sociology : Meaning and subject matter.
## A] समाजशास्त्र : अर्थ आणि अभ्यास विषय

* **प्रस्तावना :-**

मनुष्य प्राणी हा विशिष्ट शारीरिक गुण-वैशिष्ट्ये आणि प्रगल्प विचारसरणी लाभलेला सर्वश्रेष्ठ सामाजिक प्राणी म्हणून ओळखला जातो. मनुष्याचा स्वभाव हा जिज्ञासू वृत्तीचा आहे. त्यामुळेच त्याने आपल्या सभोवतालच्या विश्वासंबंधीच्या अनेक घटनांचा शास्त्रीय पद्धतीने अभ्यास केल्याचे दिसून येते. ज्ञान मिळवण्याच्या या प्रयत्नांमधूनच अनेक शास्त्रांचा उदय झालेला आहे. त्यामध्ये निसर्गामध्ये घडणाऱ्या घटनांचा अभ्यास करण्यासाठी नैसर्गिक शास्त्रांची (Natural sciences) निर्मिती झालेली आहे.

उदा :- वनस्पती शास्त्र, प्राणी शास्त्र, रसायनशास्त्र इ.

नैसर्गिक शास्त्राप्रमाणेच मनुष्याने मानवी समाजातील सामाजिक घटनांचा अभ्यास करण्यासाठी सामाजिक शास्त्रांची (Social sciences) निर्मिती केलेली आहे.

उदा :- अर्थशास्त्र, राज्यशास्त्र, समाजशास्त्र इ.

मनुष्याने विशिष्ट शरीररचना, विचार करण्याची क्षमता, स्मरणशक्ती, भाषा, शिक्षण इ. च्या साहाय्याने आपल्या समाजाचा विकास साधला आहे. प्रसिद्ध विचारवंत ॲरिस्टॉटल यांच्या मते, 'मनुष्य हा एक समाजशील प्राणी आहे.' मनुष्याला जीवन जगण्यासाठी इतर सदस्य, समूह, संस्कृती यांचा आधार घ्यावा लागतो. यामधूनच विविध

Scanned with CamScanner

सामाजिक संस्था, सामाजिक समूह निर्माण झालेले आहेत. अशा संस्थांच्या, समूहांच्या म्हणजेच संपूर्ण मानवी समाजाच्या शास्त्रीय पद्धतीने अभ्यास करण्यासाठी 'समाजशास्त्र' (Sociology) या नावाने स्वतंत्र शाखा १९ व्या शतकामध्ये उदयास आलेली आहे.

समाजशास्त्र ही संकल्पना सर्वप्रथम ऑगस्त कॉम्त यांनी 'Positive Philosophy' या ग्रंथात स्पष्ट केलेली आहे. समाजशास्त्र यासाठी इंग्रजीमध्ये Sociology ही संकल्पना त्यांनी वापरली. Sociology ही संकल्पना लॅटिन भाषेतील Socius व ग्रीक भाषेतील Logos या दोन शब्दांपासून तयार झालेली आहे. Socius म्हणजे सहचर किंवा सोबती आणि Logos म्हणजे उच्च पातळीवरील ज्ञान किंवा शास्त्र होय. याचाच अर्थ, मानवा-मानवातील साहचर्याचा अमूर्त पातळीवर अभ्यास करणारे शास्त्र म्हणजे समाजशास्त्र होय.

समाजशास्त्राच्या उदयातील व विकासातील ऑगस्त कॉम्त यांचे योगदान विचारात घेऊनच त्यांना समाजशास्त्राचे जनक म्हणून ओळखले जाते.

* Defination (व्याख्या):-

① टिशलेर, व्हायटन आणि हंटर:-

"मानवी समाजाच्या आणि मानवामानवात होणाऱ्या सामाजिक आंतरक्रियांचा शास्त्रीय पद्धतीने केलेला अभ्यास म्हणजे समाजशास्त्र होय."

② मॅक्स वेबर:-

"सामाजिक क्रियांचे अर्थपूर्णात्मक आकलन करण्याचा प्रयत्न करणारे शास्त्र म्हणजे समाजशास्त्र होय."



Scanned with CamScanner

③ हॅरी जॉन्सन:- "समाजशास्त्र हे सामाजिक समुहासंबंधीचे शास्त्र आहे."

④ मॅक आयव्हर आणि पेज:- "सामाजिक संबंध हा समाजशास्त्राचा अभ्यास विषय आहे."

⑤ किंग्जले डेव्हिस:- "समाजशास्त्र हे समाजाविषयीचे विज्ञान आहे."

⑥ हॉर्टन आणि हंट:- "मानवी सामाजिक जीवनाचा शास्त्रीय पद्धतीने केलेला अभ्यास म्हणजे समाजशास्त्र होय."

वरील व्याख्यांच्या आधारे असे दिसून येते की, मानवा-मानवातील परस्पर संबंधाचा, सामाजिक संबंधांचा अभ्यास करणारे शास्त्र म्हणजे समाजशास्त्र होय. हा सर्व अभ्यास शास्त्रीय पद्धतीने केला जात असल्याने समाजशास्त्र हे एक शास्त्र आहे.

* Subject Matter of Sociology - [समाजशास्त्राचा अभ्यास विषय]:-

नैसर्गिक आणि सामाजिक शास्त्रामध्ये प्रत्येक शास्त्राला स्वतःचा असा विशिष्ट अभ्यास विषय आहे. सामाजिक शास्त्रांमधून अर्थशास्त्रामध्ये मनुष्याच्या आर्थिक वर्तनाचा म्हणजेच आर्थिक घटकांचा अभ्यास केला जातो. राज्यशास्त्रामध्ये सत्ता, शासन, मानवी हक्क, अधिकार-चा अभ्यास केला जातो. 'सामाजिक संबंध' हा समाजशास्त्राचा मुख्य अभ्यास विषय असला तरी सामाजिक संबंध हे एकाच हेतुने घडून येणारे नसतात. सामाजिक संबंध स्पर्धात्मक, सहकार्यात्मक, प्रत्यक्ष, अप्रत्यक्ष अशा

विशिष्ट स्वरूपाचे असतात. इतर शास्त्रांमध्ये विशिष्ट घटकांचाच अभ्यास केला जातो. परंतु समाजशास्त्रात मानवी समाजाचा सर्वांगीण अभ्यास केला जातो. समाजशास्त्राचा हा अभ्यास विषय पुढीलप्रमाणे:-

① मानवाच्या सामाजिक वर्तनाचा अभ्यास:-

प्रत्येक व्यक्तीचे जन्मापासुन ते मृत्युपर्यंत समाजातील इतर व्यक्ती, समुह यांच्याशी परस्पर संबंध निर्माण होत असतात. परस्पर संबंधांची निर्मिती सामाजिक आंतरक्रियेमधुन, सामाजिक वर्तनामधुन होत असते. मॅक्स वेबर यांच्या मते, व्यक्तिच्या सामाजिक वर्तनाचा अर्थ समजुन घेणे हेच समाजशास्त्राचे उद्दिष्ट आहे. व्यक्ति इतरांशी कशा प्रकारे वर्तन करते, परस्परांना प्रभावित कशी करते, या बाबींचा अभ्यास करण्यावर समाजशास्त्रात महत्त्व दिले जाते. व्यक्तिच्या सामाजिक वर्तनाचा अभ्यास करून काही नियम स्पष्ट केले जातात.

उदा:- स्पर्धा परिक्षेमध्ये यश प्राप्त केल्यानंतर महाविद्यालयात त्या विद्यार्थिनीचा केला जाणारा सत्कार, जन्माला आलेले लहान मुल व आई या दोघातील संबंध, मुलगीच जन्माला आली म्हणून सासरच्या लोकांकडून केला जाणारा त्रास इ. यासारखी असंख्य उदाहरणे व्यक्तिच्या सामाजिक वर्तनाची म्हणजेच सामाजिक संबंधांची आहेत.

सामाजिक जीवनामध्ये निर्माण होणारे सामाजिक संबंध हे परिस्थिती सापेक्ष असतात, असे मत प्रसिद्ध समाजशास्त्रज्ञ जार्ज सीमेल यांनी व्यक्त केलेले आहे.

उदा:- परस्परांच्यावरती प्रेम करणारी भावंडे वडीलांच्या मृत्युनंतर संपत्तीसाठी संघर्ष करतात.



Scanned with CamScanner

शिक्षक - विद्यार्थी, नेता - कार्यकर्ते, पती - पत्नी, आई - वडील यांच्यातील सामाजिक संबंध विविध स्वरूपाचे आहेत. सामाजिक आंतरक्रिया म्हणजेच व्यक्तिचे सामाजिक वर्तन, विविध स्वरूपांमध्ये, भावनांमध्ये होत असल्याने, निर्माण होणारे सामाजिक संबंध व्यापक स्वरूपाचे असतात. यासाठीच सामाजिक संबंध समजुन घेत असतानाच मानवाच्या सामाजिक वर्तनाचा अभ्यास समाजशास्त्रामध्ये केला जातो.

② विविध मानवी समाज व समूहांचा अभ्यासः-

मनुष्याला स्वतःच्या गरजा स्वतः पुर्ण करणे अशक्य असल्याने तो इतरांच्या वरती अवलंबुन राहतो. व्यक्तिच्या अशा परस्पर संबंधामधुनच मानवी समाजामध्ये अनेक लहान - मोठ्या समुहांची निर्मिती झालेली आहे.

उदा:- कुटुंब, धर्म, कामगार संघटना इ.

अनेक सामाजिक समुहांबरोबर व्यक्तिच्या आंतरक्रिया होत असतात. अशा वेळी व्यक्ति जास्त ज्या समुहाची सदस्य असते, अशा समुहाविषयी व्यक्तिच्या मनात आपलेपणाची भावना असते. व्यक्ति ज्या समुहाची सदस्य असत नाही, अशा समुह-विषयी मात्र व्यक्तिच्या मनामध्ये आपलेपणाची भावना निर्माण होईलच असे नाही. अशा भिन्न प्रकारच्या भावनांचा परिणाम व्यक्तिच्या वर्तनावर होत असतो. व्यक्तिच्या वर्तनातून समुह - समुहातील वेगळेपणा निश्चित होत असतो. अशा समुहांचा व समाजाचा अभ्यास समाजशास्त्रामध्ये केला जातो.

मानवी समाजातील सर्वच सामाजिक समुह एकसारखे समान असतातच असे नाही. प्रत्येक समाज आपल्या संस्कृतीशी संबंधित असतो. त्यामुळे समाजाच्या अभ्यास करताना देखील विविधता, भिन्नता निदर्शनास येते.

विविध मानवी समाज आणि सामाजिक समूह यांचा शास्त्रीय पद्धतीने अभ्यास करणे, हा समाजशास्त्राचा अभ्यास विषय आहे. हा अभ्यास दोन प्रकारे केला जातो.

A) सर्वांगीण किंवा समग्र अभ्यास:-

काही संशोधक, अभ्यासक एखाद्या समाजाच्या किंवा समूहाच्या अभ्यास तपशील वारपणे करण्यावर भर देतात. त्या समाजातील संस्कृती, जीवनपद्धती, सामाजिक संस्था यांसारख्या अनेक घटकांचा यामध्ये अभ्यास केला जातो. याचाच अर्थ एखादया समाजाचा आणि समूहाचा समग्रपणे अभ्यास समाजशास्त्रामध्ये केला जातो.

उदा:- एखादया आदिवासी जमातीचा केला जाणारा अभ्यास.

B) विशिष्ट घटकांचा अभ्यास:-

एखादया समाजाच्या किंवा समूहाचा समग्र अभ्यास करणे, कधी कधी गुंतागुंतीचे आणि अनावश्यक वाटते. अशा वेळी त्या समाजातील समूहातील काही विशिष्ट घटकांचाच अभ्यास करण्यास प्राधान्य दिले जाते.

उदा:- एखादया शहरातील झोपडपट्टीचा केला जाणारा अभ्यास.

③ अखिल मानवी समाजाचा अभ्यास:-

अनेक मानवी समाजांमध्ये काही बाबतीत वेगळेपणा, भिन्नता दिसून येत असली तरी अनेक बाबी सर्वच समाजांमध्ये समान दिसून येतात. त्यामुळे संपूर्ण सर्व मानवी समाजांचा अभ्यास एकत्रित करणे आवश्यक आहे. असा अभ्यास केल्याने मानवी समाजाचे आकलन होऊ शकते.



Scanned with CamScanner

संपुर्ण विश्वातील अखिल मानव समाजाला अभ्यासाचा विषय ठरवुन, संपुर्ण मानवी समाजाला लागु पडणारे नियम शोधण्याचे काम समाजशास्त्रामध्ये केले जाते

उदा:- प्रसिद्ध समाजशास्त्रज्ञ एमिल दुरखिम यांनी सर्वच समाजात घडून येणाऱ्या आत्महत्यांचा अभ्यास करून आत्महत्या समस्येविषयी जो सिद्धांत स्पष्ट केला, तो सर्वच समाजांना लागु पडलेला आहे. याचाच अर्थ अखिल मानव समाजाचा अभ्यास करून समाजाला लागु पडणारे नियम शोधण्याचे काम समाजशास्त्रामध्ये केले जाते.

④ **सामाजिक संस्थांचा अभ्यास:-**

मनुष्याने आपल्या असंख्य गरजांची पुर्तता करण्यासाठी सामाजिक संस्थांची निर्मिती केलेली आहे.

उदा:- विवाहसंस्था, धर्मसंस्था, कुटुंबसंस्था इ.

सामाजिक संस्थांना व्यक्तीच्या सामाजिक जीवनात महत्वाचे स्थान प्राप्त झालेले आहे. व्यक्ति आणि सामाजिक संस्था यांच्यामध्ये घनिष्ठ सामाजिक संबंध निर्माण होतात. अशा वेळी मानवी वर्तन अभ्यासण्यासाठी सामाजिक संस्थांचा अर्थ समजुन घेण्यासाठी संस्थांची रचना, कार्य, परिवर्तन इ. चा अभ्यास करण्यासाठी सामाजिक संस्थांचा अभ्यास समाजशास्त्रामध्ये केला जातो.

⑤ **सामाजिक परिवर्तनाचा अभ्यास:-**

कोणताही मानवी समाज कायमस्वरूपी स्थिर असत नाही. अनेक कारणांमुळे मानवी समाजामध्ये परिवर्तन बदल घडून येत असतात. परिवर्तनामुळे सामाजिक संबंध, सामाजिक संस्था, समाजरचना यामध्येही बदल होत असतात



Scanned with CamScanner

सामाजिक परिवर्तन याचा अर्थ, परिवर्तनास साहाय्यक करणारे घटक, परिवर्तनाचे परिणाम त्या इ. चा अभ्यास करण्यावर समाजशास्त्रात भर दिला जातो
उदा:- नागरीकरण, जागतिकीकरण इ.

## ⑥ सामाजिक समस्यांचा अभ्यास:-

मानवी समाजामध्ये वैयक्तिक आणि सामाजिक विघटनातून अनेक प्रश्न, समस्या यांची निर्मिती होत असते.
उदा:- दारिद्र्याची समस्या, भ्रष्टाचाराची समस्या इ.
समाजातील सर्वच समस्यांची निर्मिती मनुष्याच्या विशिष्ट वर्तनामधुनच होत असते. सामाजिक समस्यांचे परिणाम समाजावरती होत असतात. परिणामी अशा समस्या नष्ट करण्यासाठी त्यावरती उपाययोजना शोधण्यासाठी त्या समस्यांचा शास्त्रीय पद्धतीने अभ्यास करणे महत्त्वाचे ठरते. त्यामुळे समाजशास्त्रामध्ये सामाजिक समस्यांचा शास्त्रीय पद्धतीने अभ्यास केला जातो.

## ⑦ समाज आणि पर्यावरण:-

नैसर्गिक, सामाजिक व सांस्कृतिक पर्यावरणाचा प्रभाव मानवी जीवनावर होत असतो. पर्यावरणाच्या समाजावरती कोणता परिणाम होतो, आणि समाजाच्या व व्यक्तिच्या वर्तनाचा पर्यावरणावरती कोणता परिणाम होतो? याचा अभ्यास समाजशास्त्रामध्ये केला जातो. पर्यावरण आणि मानवी समाज यांच्यातील आंतरक्रियांचा स्वतंत्रपणे अभ्यास करण्यासाठी 'पर्यावरणीय समाजशास्त्र' ही स्वतंत्र शाखा निर्माण झालेली आहे.



Scanned with CamScanner

MAHAGURU Page No.:
Date: / /

(8) सामाजिक संबंधांच्या अभ्यास:-

सामाजिक संबंध हेच समाजशास्त्राचा मुख्य अभ्यास विषय आहे. समाजात निर्माण होणारे सामाजिक संबंध तीन प्रकारचे असतात.

A] व्यक्ति - व्यक्तीमधील परस्पर संबंध:-
उदा:- गुरु- शिष्य, पती-पत्नी इ.

B] व्यक्ति - समुहामधील परस्पर संबंध:-
उदा:- मालक व कारखान्यातील कामगार, नेता व अनुयायी इ.

C] समुह - समुहातील परस्पर संबंध:-
उदा:- दोन संघातील सामना, दोन कुटुंबातील आंतरक्रिया इ.

वरील प्रकारांमध्ये निर्माण होणारे सामाजिक संबंध सहकार्यात्मक, स्पर्धात्मक अशा विविध स्वरूपाचे असु शकतात. अशा सामाजिक संबंधामधूनच समाजाची निर्मिती होत असते. समाज हे सामाजिक संबंधांचे जाळे आहे; त्यामुळे समाजशास्त्रामध्ये सामाजिक संबंधांचा अभ्यास केला जातो.

* सारांश:-

समाजशास्त्रामध्ये वरील प्रमाणे महत्त्वाच्या अभ्यास विषयाबरोबरच सामाजिक नियंत्रण, सामाजिक विचलन, दर्जा आणि भुमिका याचादेखील अभ्यास केला जातो. समाजशास्त्रामध्ये समाजातील विविध घटकांचा स्वतंत्रपणे शास्त्रीय अभ्यास करण्यासाठी अनेक शाखा निर्माण झालेल्या आहेत.
उदा:- ग्रामीण समाजशास्त्र, शहरी समाजशास्त्र, औदयोगिक समाजशास्त्र, वैदयकिय समाजशास्त्र इ.
राज्यशास्त्र, अर्थशास्त्र यांसारख्या सामाजिक शास्त्रांमध्ये व्यक्तिच्या विशिष्ट प्रकारच्या संबंधांचाच अभ्यास केला जातो. मात्र समाजशास्त्रामध्ये व्यक्तीच्या सर्वांगीण सामाजिक संबंधांचा अभ्यास केला जातो.



Scanned with CamScanner